# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

## प्रारुप मतदार यादी / याद्या प्रसिध्दीची नोटीस

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ साठी विधानसभेच्या मतदार यादीच्या आधारे तयार केलेल्या मतदार याद्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १४ अन्वये अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रासाठी दिनांक ०१/०७/२०२५ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १ ते १७ मध्ये विभागुन प्रभाग निहाय छापून घेवुन अधिप्रमाणित केलेली आहे. सदर मतदार याद्या आज गुरुवार दिनांक २०/११/२०२५ रोजी महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना माहितीसाठी खाली नमुद केलेल्या ठिकाणी ठेवण्यात आलेल्या आहेत.

सदरच्या मतदार यादीबाबत हरकती / सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात दिनांक २०/११/२०२५ ते दि.२७/११/२०२५ अखेर कार्यालयीन वेळेत खालील ठिकाणी स्विकारण्यात येतील. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती/ सुचनांचा विचार केला जाणार नाही.

(१ ) अहिल्यानगर महानगरपालिका मुख्य कार्यालय (नविन प्रशासकीय इमारत, अ.नगर-संभाजीनगर रोड)

(२) प्रभाग समिती कार्यालय क्र.१ सावेडी

(३) प्रभाग समिती कार्यालय क्र.२ शहर

(४) प्रभाग समिती कार्यालय क्र.३ झेंडिगेट

(५) प्रभाग समिती कार्यालय क्र.४ बुरुडगाव

(६) अहिल्यानगर महानगरपालिकेचे संकेतस्थळ- www.amc.gov.in येथे फोटो विरहित मतदार यादी निःशुल्क पहाणेसाठी उपलब्ध आहे.

टिप- नागरिकांना प्रारुप मतदार यादीच्या प्रती माहिती व सुविधा केंद्रात विक्रीसाठी उपलब्ध केलेल्या आहेत. सदरील यादीची किंमत ही प्रती पृष्ठ रक्कम रुपये २/- प्रमाणे ठेवण्यात आलेली आहे.

उपायुक्त (निवडणुक)
अहिल्यानगर महानगरपालिका

CS CamScanner